**भुसंपादन अर्ज क्र. ७८०/२००९**
**दस्तगीर वि. महाराष्ट्र व इतर**
**नि. नं. ४६.**



**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १– दस्तगीर बंदगी शेख यांची शपथेवर उलटतपासणी गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्यातर्फे श्री.एस.एम.देशपांडे, सहाय्यक सरकारी वकील साहेब.**

२८. माझ्या जमीनीचा सर्वे क्रमांक ३१ आहे. माझी एकुण ६ एकर २६ गुंठयामधुन ३४ गुंठे जमीन संपादीत झाली आहे. उर्वरीत जमीनीवर वहिती चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, उरलेल्या जमीनीमध्ये मी पारंपारीक पिकं घेत आहे. जुन्या गावापासुन संपादीत जमीन ही दोन किलोमिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जमीनीला चिटकुन कोणाचीही जमीन एन.ए.ले-आऊट झालेली नव्हती. मी त्याची कागदपत्रे दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, संपादनाच्या पुर्वी आमच्या गावात खरेदी विक्रीचे व्यवहार झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भुकंपरोधक घरं बांधण्यासाठी खडकाळ जमीनी संपादीत केल्या होत्या. गावाचे पुर्नवसन हे मध्यम जमीनीवर झालं. संपादनाच्या पुर्वी संपादीत जमीनीमध्ये आम्ही आंब्याची झाडं वगैरे लावत होतो. (साक्षीदार स्वत: होऊन सांगतो की) सुर्यफूल, ऊस, भुईमूग हे देखील घेत होतो. जमीनीतुन मिळणा-या उत्पन्नाचा पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावामध्ये शैक्षणीक सोईसुविधा, मार्केट, कारखाने नाहीत. जास्तीचा मावेजा मिळावा म्हणुन ॲवार्ड, नक्कला इत्यादी दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ती कागदपत्रे मी काढली नाहीत. (साक्षीदार स्वत: होऊन सांगतो की) वकील साहेबांनी काढली आहेत. त्या कागदपत्रात काय काय लिहीलं आहे हे मला सांगता येणार नाही. स्क्वेअर फुटप्रमाणे मावेजा मिळावा असं लिहीलं आहे.

प्रश्न :- तुम्ही तुमच्या गावाची कागदपत्रं न दाखल करता दुस-या गावच्या प्लॉटींगच्या जमीनीचे कागदपत्रं दाखल केली आहेत ?

उत्तर :- दुस-या गावच्या प्लॉटींगचा भाव आम्हाला मिळावा म्हणुन दाखल केली आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, सास्तुर, नारंगवाडी आणि माकणी चे जे प्लॉट आहेत ते माझ्या संपादीत जमीनीला चिटकुन नाहीत.

**२९.** हे म्हणणे खरे नाही की, कोणती जमीन संपादीत करायची हे पाहण्यासाइी पुर्नवसनाचे अधिकारी आले होते. (साक्षीदार स्वत: होऊन सांगतो की) तेव्हा मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी संपादीत जमीन पाहण्यासाठी पुर्नवसनाच्या अधिका-यांशिवाय कोणीही आले नाही. (साक्षीदार स्वत: होऊन सांगतो की) लातुरचे बारटकर साहेब आले होते. आम्ही त्यांच्याकडे लेखी अर्ज देवुन त्यांना बोलावुन घेतले होते. बारटकर साहेबांना बोलाविल्याबाबत मी शासनाला कळविले नव्हते. बारटकर साहेबांनी काय काय केले याची माहिती मी शासनाला कळविली नाही. बारटकर साहेबांनी कोणता कागद दिला हे काही माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, बारटकर साहेबांनी काय लिहीले आहे हे मला माहित नाही.

**३०.** हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी आम्ही पुरावा न दिल्यामुळे प्रकरण खारीज करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यासमोर भुसंपादनाचा निवाडा घोषीत करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, संपादनाच्या वेळेस संपादीत जमीनीला रुपये २२,०००/- ते २८,०००/- असा प्रति हेक्टर भाव होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by KETANKUMAR UTTAM TELGAONKAR
Date: 2025.11.28 13:12:03 +0530

**(केतनकुमार तेलगांवकर)**

**दिनांक २७/११/२०२५.** **सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, उमरगा.**